बेस्टमध्ये मोबाईल, सोने गहाळ झाले असल्यास परत मिळणार!

■ प्रतिनिधी, मुंबई

बेस्टमधून प्रवास करणाऱ्या मुंबईकरांसाठी अत्यंत महत्वाची अपडेट आहे. बेस्टमधील प्रवासादरम्यान तुमचा किंवा तुमच्या ओळखीच्या व्यक्तीचा मोबाईल हरवला आहे का? तर हरवलेला मोबाईल परत मिळण्याची दाट शक्यता आहे. कारण बेस्ट प्रशासनाने बसमध्ये हरवलेल्या मोबाईलची यादी जाहीर केली आहे.

सप्टेंबर महिन्यात बेस्ट बसमध्ये हरवलेल्या मोबाईल फोनची यादी समोर आली आहे. बेस्ट विभागाने आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन यासंदर्भातील अपडेट दिली आहे.

बेस्टतर्फे गहाळ झालेल्या मोबाईलची यादी जाहीर

तुमचा हरवलेला मोबाईल पुन्हा मिळवण्यासाठी काही महत्वाचे दस्तावेज सोबत आणावे लागतील.जसे आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन कार्ड, पासपोर्ट यापैकी एक पुरावा सोबत आणावा लागेल.

मोबाईलचे बिल किंवा कॅश मेमो, सिम कार्ड कंपनीकडून डिटेल्सचा तपशील, पोलिसांत तक्रार केल्याची एनसी कॉपी हे कागदपत्र सोबत आणलेल्या नागरिकांना सोबत आणलेली कागदपत्र दाखवून आपल्या मोबाईलची ओळख पटवावी लागेल.

इतर मौल्यवान वस्तूंसाठी जसे कॅश, सोने, चांदी, मोती, हिरा अशा मौल्यवान वस्तू हरवल्या असतील आणि त्यासाठी दावा करायचा असेल तर मुंबई / उपनगरियचे आयडी आणि निवासाचा पत्ता (आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट इ.) पोलीस एनसी/एफआयआरची कॉपी, कॅश मेमो/मौल्यवान वस्तूंचे बिल इ.इत्यादी सोबत आणल्यास तुमचे गहाळ झालेल्या वस्तू मिळू शकतील.

वादग्रस्त 'आयकिल्ड बापू' चित्रपटाचे पुर्नवलोकन

■ प्रतिनिधी, मुंबई

'आय किल्ड बापू' चित्रपटाची निर्मिती महात्मा गांधींची बदनामी करण्यासाठी, असल्याच्या याचिकाकर्त्यांच्या दाव्यावरून, बॉम्बे हाय अर्पाईल्ट पॅनेलचे पूर्नवलोकन करण्यासाठी आक्षेपार्ह साहित्य किंवा सामाजिक विसंगतीला गंभीर धोका निर्माण करणारी इतर कोणतीही सामग्री तपासण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने आय किल्ड बापू चित्रपटाचे पूर्वावलोकन करण्यासाठी तीन सदस्यीय पॅनेलची नियुक्ती केली आहे. हा चित्रपट नुकताच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला. न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठाने मुख्य न्यायमूर्ती (निवृत्त) अमजद सईद, न्यायमूर्ती अभय ठिपसे आणि ज्येष्ठ अभिनेते/दिग्दर्शक अमोल पालेकर यांचा समावेश असलेली समिती नेमून चित्रपटाचे पुनरावलोकन करून आहवाल सादर केला. कुर्ला येथील रहिवाशी आणि व्यापारी मोहम्मद अन्सारी यांच्या याचिकेवर हा आदेश देण्यात आला आहे. ते म्हणाले की, अश्विनका अशोक सरोगी यांच्या पत्नी सरला सरोगी यांचा हा चित्रपट केवळ दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आला आहे आणि भारताच्या फाळणीसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना जबाबदार धरून त्यांचा अपमान आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सीबीएफसी) ला चित्रपटाला दिलेले सेन्सॉर प्रमाणपत्र मागे घेण्याचे निर्देश देण्याची विनंती अन्सारी यांनी न्यायालयाला केली आहे. या चित्रपटात फाळणी आणि मुस्लिमांनी पाकिस्तानातील हिंदूंवर आणि भारतातील हिंदूंनी मुस्लिमांवर केलेले अत्याचार दाखवून गांधींना मुकबधिर प्रेक्षक म्हणून दाखवले आहे. आणि इतर विविध अपमानास्पद टोन आणि शब्द वापरण्यात आले आहेत, असे दाव्यात म्हटले आहे.

बलात्कार पिडित तरुणीला गर्भपाताची परवानगी

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाने २५ वर्षे वयाच्या लैंगिक अत्याचार पीडित तरुणीला २९ आठवड्यांत गर्भपात करण्यास परवानगी दिली. न्यायमूर्ती रेवती-मोहिते डेरे आणि गौरी गोडसे यांनी सोमवारी एका महिलेने तिच्या वडिलांमार्फत दाखल केलेल्या याचिकेवर हे निर्देश दिले, ज्यात ती बलात्काराची बळी असल्याचे कारण देत परवानगी मागितली होती. २४ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी MTP साठी HC ची परवानगी आवश्यक असते. ५ ऑक्टोबर रोजी पिडितेच्या वकील सायमा अन्सारी यांनी युक्तीवाद केला की, शारीरिक आणि बौद्धिकदृष्ट्या विकलांग आहे. या युक्तीवादानंतर न्यायाधीशांनी छापली प्रमिलाताई राजे हॉस्पिटलला महिलेची तपासणी करण्यासाठी तातडीने वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याचे निर्देश दिले. ९ ऑक्टोबर रोजी न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला. पिडितेच्या बौद्धिक अपंगत्वामुळे ती तिच्या नवजात बालकाची काळजी घेऊ शकणार नाही. अशा प्रकारे, पॅनेलने MTP ची शिफारस केली. त्यात म्हटले आहे की गर्भधारणा सुरू ठेवल्याने पीडित व्यक्तीच्या आरोग्यास उच्च धोका असू शकतो आणि त्याला ऑपरेटिव्ह हस्तक्षेप आवश्यक आहे. वैद्यकीय अहवालाचा विचार करून, लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या आणि शारीरिक आणि बौद्धिक अपंगत्वाने ग्रस्त असलेल्या याचिकाकर्त्यांना पिडितेचा २९ व्या आठवड्यात गर्भपात करण्याची न्यायालयाने परवानगी दिली.

महिलांनी तोकडे कपडे घालणे, अश्लीलता नाही

मुंबई : महिलांनी छोटे कपडे घालून नाचणे म्हणजे अश्लिलता नाही असा निर्वाळा मुंबई हायकोर्टने दिला आहे. यामुळे कोणालाही त्रास होण्याचा प्रश्न येक शकत नाही असे निरिक्षणही कोर्टने नोंदवलें आहे. याप्रकणी पाच जणांविरुद्ध दाखल करण्यात आलेली याचिका कोर्टाना रद्द केली आहे. न्यायमूर्ती विनय जोशी आणि वाल्मिकी मेनेसह यांच्या बेंचने याप्रकणी सुनावणी करताना महिलांनी तोकडे कपडे घालणे ही सामान्य गोष्ट आहे. एखाद्या महिलेने छोटे कपडे घातले तर त्याला अश्लिलता म्हणता येणार नाही असे म्हटले आहे. दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये तोकडे कपडे घालून नाचत असल्याने पाच महिलांविरुद्ध अश्लिलतेचा उल्लेख केला आहे. सध्याच्या जमान्यात छोटे कपडे घालणे सामान्य गोष्ट आहे. चित्रपटांमध्ये दाखवल्याप्रमाणे कपडयांची स्टाईल केली जात आहे.

परीक्षेत उत्तीर्ण करण्यासाठी १० हजार रुपयांची लाच!

■ मुंबई विद्यापीठातील धक्कादायक प्रकार

■ प्रतिनिधी, मुंबई

परीक्षेत पास करतो सांगून १० हजार रुपये मागितल्याचा धक्कादायक प्रकार मुंबई विद्यापीठातून नुकताच समोर आला आहे. हा प्रकार कोणत्या छोटया संस्थेत नसून मुंबईतील प्रतिष्ठीत मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलमध्ये घडला आहे. येथे शिकत असलेल्या नापास विद्यार्थ्यांला पास करण्यासाठी एका बडया अधिकाऱ्याने लाच मागितल्याचा आरोप विद्यार्थ्याने केला आहे. तक्रारदार विद्यार्थी हा आयडॉलमध्ये पदवीच्या दुसऱ्या वर्षात शिकतो. चौथ्या सत्रात त्याला तीन विषयात एटी-केटी लागली होती. त्यामुळे या विषयात उत्तीर्ण व्हायचे असल्यास दहा हजार रुपये दे अशी मागणी आयडॉलमधील अधिकाऱ्याने केल्याचा आरोप विद्यार्थ्याने केला आहे.

संबंधित विद्यार्थ्याने युवासेना विद्यार्थी संघटनेला यासंदर्भात माहिती दिली. एका इन्व्हलपमधून दहा हजार त्यासोबतच हॉल तिकीट आणि संपर्क क्रमांक लिहून देण्यास या संबंधित व्यक्तीने त्या विद्यार्थ्याला सांगितल्याची माहिती समोर येत आहे. या सगळ्या प्रकरणानंतर युवासेना आक्रमक झाली आहे. विद्यार्थ्याने संबंधित व्यक्तीचा फोटो आणि या सगळ्या संबंधीची तक्रार मुंबई विद्यापीठाची कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्याकडे केली असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठ परीक्षा विभागाचा ऊन्हाळी सत्र परीक्षांचा निकाल आणि पुनर्मूल्यांकनाकरीता उशीर होत आहे. या दिरंगाईमुळे अनेक विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याकरिता सहाय्यक कुलसचिव हिम्मत चौधरी यांना युवासेनेच्यावतीने जाब विचारण्यात आला.

युवासेना माजी सिनेट सदस्यांनी युवासेना पदाधिकाऱ्यांसह कुलसचिवांची भेट घेतली. पण समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे त्यांना घेराव घालण्यात आला होता. जोपर्यंत मान.कुलगुरु किंवा प्र कुलगुरु येऊन तोडगा काढत नाही तोपर्यंत आम्ही येथून हलणार नाही अशी भुमिका युवासेनेने घेतली आहे.

मुंबईत वातावरणातील बदलामुळे साथीच्या आजारात वाढ

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईकरांना सध्या एकीकडे ऑक्टोबर हीटचा सामना करावा लागत आहे तर दुसरीकडे परतीच्या पावसाचीही शक्यता आहे. मुंबईत सातत्याने बदलत चाललेल्या हवामानाचा परिणाम मुंबईकरांच्या आरोग्यावर होऊ शकतो. १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या काही भागात अवकाळी रिमझिम पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसे झाल्यास मुंबईकरांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळेल. पण यासोबत विषाणूजन्य आजार आणि ढासांमुळे प्रसरणाच्या आजारांचा धोका वाढू शकतो, अशी शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

मुंबईतील सध्याचे तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

शहरात पसरलेले हे धुरके पाहता श्वसनाचे विकार आणि दमा असणाऱ्यांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य यंत्रणांनी केले आहे. याशिवाय अशुद्ध विषाणूंच्या संसर्गाचाही मोठा धोका आहे.

मुंबईतील हवामानात होणारा अचानक बदल नागरिकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम करू शकतो, अशी चिंता डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. तापमानात वाढ, अवकाळी पाऊस, शरीराला जुळवून घेण्यासाठी थोडा वेळ लागतो. प्रतिकारशक्ती चांगली असलेले नागरिकच हे बदल बऱ्याच प्रमाणात सहन करतात. पण आजारी, प्रतिकारशक्ती कमकुवत असलेल्या व्यक्तींना यामुळे अडचणींचा सामना करावा लागू शकतो. उष्ण तापमानामुळे, लोक स्ट्रोक, हायपोटेन्शन, सिंकिंग डिहायड्रेशन आणि त्यामुळे सावरेच्या पातळीत चढ-उतार यासारख्या आरोग्य समस्यांना बळी पडू शकतात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

गुरुवारी मुंबई उपनगराचे कमाल तापमान ३४.७ अंश सेल्सिअस तर शहराचे ३१.३अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेल्याची माहिती प्रादेशिक हवामान विभागाने दिली. कडक उन्हामुळे लोकांना घाम फुटत आहे. अशा परिस्थितीत लोकांना हायड्रेशनकडे लक्ष देण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. शरीराची स्वतः ची यंत्रणा शरीराचे तापमान राखते. हवामानातील अचानक बदलाचा परिणाम माणसाच्या शरीरावर होतो.

नवरात्रीतील गरब्याला मेट्रोची साथ; रात्री उशिरापर्यंत मेट्रो चालू राहणार

गरब्याचा आनंद मनसोक्त लुटता येणार

■ प्रतिनिधी, मुंबई

नवरात्र उत्सवासाठी मेट्रो मार्ग २ अ आणि ७ वर १४ अतिरिक्त फेऱ्यांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे अंधेरी पश्चिम आणि गुंदवली दरम्यान रोटबची मेट्रो ही रात्री १०.३० ऐवजी रात्री १२.२० ला धावेल. त्यामुळे नवरात्र उत्सवादरम्यान रात्री उशिरापर्यंत आरामदायक आणि सुरक्षित प्रवास करता येणार आहे. नवरात्र उत्सवामध्ये गरब्याचा आनंद लुटण्यासाठी लाखोंच्या संख्येने नागरिक घराबाहेर पडत असतात. याच काळामध्ये नागरिकांना रात्रीच्या वेळी प्रवास करावा लागतो. पण त्यासाठी बऱ्याच अडचणी निर्माण होत असल्याचं पाहायला मिळते. त्याच पार्श्वभूमीवर नागरिकांना आरामदायी आणि सुरक्षित प्रवास करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

नवरात्र उत्सवाच्या कालावधीमध्ये म्हणजेच १९ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये मेट्रो मार्ग २ अ आणि ७ या स्थानकांवरुन शेवटची मेट्रो ही रात्री १२.२० ला धावणार आहे. दरम्यान यामुळे प्रवाशांना प्रवास करण्यास सोपं होईल. आतापर्यंत या मेट्रोमुळे सुमारे पाच कोटी नागरिकांनी या मेट्रोमधून प्रवास केला आहे. नवरात्रीच्या कालावधीमध्ये म्हणजे १९ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सुमारे १५ मिनिटांच्या अंतराने एकूण १४ अतिरिक्त फेऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.मध्या मेट्रो मार्ग २ अ आणि ७ या मार्गांवर गुंदवली ते अंधेरी पश्चिम दरम्यान सोमवार ते शुक्रवार दरम्यान सकाळी ५.५५ ते रात्री १०.३० या कालावधी सुमारे २५३ इतक्या फेऱ्या होतात. तर या फेऱ्या दर दहा मिनिटांनी धावत असतात.

इस्रायल-पॅलेस्टाइन युद्धाबद्दल सोशल मीडियावर काहीही पोस्ट करताना सावधान!

■ प्रतिनिधी, मुंबई

पॅलेस्टाइनमधील दहशतवादी संघटना असलेल्या हमास आणि इस्रायलमध्ये सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांमध्ये विभाजन करण्याचा कट आखला जात आहे. इस्रायल आणि पलेस्टाइनदरम्यानच्या या युद्धाचा परिणाम थेट महाराष्ट्रामध्येही दिसून येत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात विशेष सायबर कंट्रोल रुम तयार करण्यात आला आहे. या युद्धासंदर्भातील चुकीचे दावे, व्हिडीओ आणि फोटो पोस्ट करणाऱ्यांवर या सायबर कंट्रोल रुममधून लक्ष ठेवलं जाणार आहे. त्यामुळेच या युद्धासंदर्भात सोशल मीडियावर कोणतीही पोस्ट करताना अधिक सावध राहणे शहाणपणाचे ठरणार आहे. सोशल मीडियावर अनेक असे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करुन त्यामाध्यमातून गाझा पट्टीत इस्रायलकडून अत्याचार होत असल्याचा दावे केले जात आहेत. या कंटेंच्या माध्यमातून लोकांना पॅलेस्टाइन आणि हमासचे समर्थन करण्याचं आवाहनही केले जात आहे. महाराष्ट्रामध्ये असे कट उघडून लावण्यासाठी विशेष सायबर कंट्रोल रुम तयार करण्यात आली आहे.

धार्मिक तेढ उत्पन्न होऊ नये म्हणून खबरदारी

इस्रायलमधील संघर्षाच्या सायबर सेलच्या माध्यमातून प्रोपगंडा पसरवणाऱ्यावर नजर ठेवली जाणार आहे. सोशल मीडियावर अकाऊंट्सवरही विशेष लक्ष असणार आहे. तसेच खोटया आणि फसव्या फोटो, व्हिडीओंच्या आधारे तथ्यहीन आणि विशिष्ट हेतूने केल्या जाणाऱ्या दावे करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल असांही सांगण्यात आले आहे. कट्टरवादी लोकांकडून खोटया व्हिडीओ आणि फोटोंच्या आधारे भारतामधील मुस्लिम समाजामधील लोकांची माथी भडकवण्याचा प्रयत्न केला जाह आहे. यासाठी ही खबरदारी घेण्यात आली आहे.

मुंबईत एमएमआरडीएच्या इमारतीत बॉम्बची अफवा

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील एमएमआरडीए च्या इमारतीच्या पार्किंगमध्ये एका वाहनात बॉम्ब असल्याची अफवा समोर आली होती. त्यांनतर पोलिसांनी घडनास्थळी दाखल होऊन परिसर रिकामा केला होता. मात्र घटनास्थळी कोणतीही बॉम्बसदृश्य वस्तू आढळली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. दरम्यान बॉम्ब असल्याची माहिती दिलेला चालक नशेत आढळला असून त्याची चौकशी सुरू आहे. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील पॅमिली कोर्टच्या मागे एमएमआरडीएची इमारत आहे या इमारतीच्या बाजूला जिओ वार्ल्ड कन्वेंशन सुद्धा आहे. उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा देखील याच भागात असल्याने मुंबई पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान या दौऱ्याच्या आधी बॉम्बची अफवा पसरल्यामुळे सुरक्षा यंत्रणांची धावपळ उडाली आहे. बॉम्ब ठेवल्याची माहिती मिळताच मुंबई पोलिसांच्या बॉम्बशोधक व बॉम्ब नाशक पथकानी गाडी घटनास्थळावर दाखल होऊन इमारतीमध्ये बॉम्ब आहे का की निनावी कॉल आहे या संदर्भात पोलीस सर्च ऑपरेशन सुरू केले होते.

अभिजीत राणे
www.abhijeetrane.in
समुह संपादक
मुंबई मित्र | वृत्त मित्र
www.aryf.in | www.dhadakkamgarunion.in | www.livemumbaimitra.com

■ **फडणवीसांनी घोषणा केली; कुस्तीपटूंचा प्रश्न सुटणार!**
हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरीसारखे किताब जिंकून महाराष्ट्राची मान उंचावणाऱ्या कुस्तीपटूंना मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनाचा प्रश्न गेली अनेक वर्षे तसाच राहिलेला आहे. गेली १३ वर्षांतील दरमहा अडीच ते सहा हजार रुपयांची रक्कम पाहिली तर या ज्येष्ठ कुस्तीपटूंना सन्मानाऐवजी बंचलेलाच सामोरे जावे लागले. मात्र आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच या मानधनात तिप्पट वाढ करण्याची घोषणा केली आहे. फडणवीसांनी आश्वासन दिले आहे म्हणजे त्याची पूर्तता होणार हे निश्चित आहे. कुस्ती, हा एका अर्थाने महाराष्ट्रा खेळ आहे. खुराकावरच प्रचंड खर्च होतो, त्यामुळे अनेकदा सधन घरातील खेळाडूनाच हा खर्च परवडतो. गरीब घरातील गुणवंत कुस्तीपटूंच्या पाठीशी आर्थिक बळ उभे करण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे. बरोबर याच दृष्टिकोनातून विचार करून फडणवीसांनी कुस्तीपटूंच्याबाबतीत महत्त्वाची घोषणा केली आहे.

■ दोन गटातील राष्ट्रवादीत सध्या कुरघोड्यांचे राजकारण सुरू आहे. दोन्ही बाजूंचे नेते आरोप करताना कुणाचीही तमा न बाळगता तोंडसुख घेतायेत. कुणीही पुरावे मागत नाहीत. तक्रारीची त्यांना गरजच नाही. संधी मिळताच तोंड वाजव. इतकाच त्यांचा कालबद्ध कार्यक्रम सुरु आहे.

■ राज्यात अनेक गंभीर प्रश्न आहेत. ते कायमस्वरुपी सोडवण्यात प्रमुख नेत्यांना रस नाही. काही करून महाराष्ट्राची सत्ता आपल्याकडे राखण्यासाठी मोठा पक्ष भाजपा मित्रपक्षासह प्रयत्न करतोय.तर विरोधी पक्ष त्यांची सत्ता उलथविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

■ सत्तासंघर्षाच्या खेळात इंडी, सीवीआयसह पत्रकार सरकार व प्रमुख पक्षांचे टार्गेट बनले आहेत. त्यासाठी त्यांच्यावर गुपत पाळत ठेवली जात आहे. आणीबाणी नंतर प्रथमच ही परिस्थिती पत्रकार अनुभवत असल्याने काही संतप्त झालेत तर काही भांबावले आहेत.

■ नवरात्रीत दांडियाची धूम रंगविण्यासाठी दरवर्षीप्रमाणे तरुणाई उत्सुक आहे. सजलेल्या बाजारपेठांतून नवरंगी कपडे खरीदण्यासाठी झुंबड उडत आहे. गर्दीत साथीचे रोग पसरू नयेत म्हणून मनपा तर अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस सज्ज आहेत.

■ अकरा महिन्यांच्या करारावर तीन हजार पोलिसांना कंत्राटी तत्त्वावर सेवेत समाविष्ट केले जाणार आहे. यामुळे बंदोबस्ताचा ताण कमी होईल. परंतु बांधकाम व्यवसायात निवृत्त पोलिसांचा सुळसुळाट होऊन दलालीच्या धंदयात गैरप्रकार होतोय तो कंत्राटींमुळे बोकाळेल.

■ ईशान्य मुंबईतील चेंबूर ते देवनार, गोवंडी परिसरात गोवा, कोल्हापूरमार्गे येणाऱ्या अंमली पदार्थांनी विळखा घातलाय. आबाल वृध्दांशिवाय विद्यार्थ्यांच्या दप्तरात एमडी ड्रग व चावडरची पाकीट मिळायलाने शिक्षकांसह पालकवर्ग हादरलाय परंतु जाणकार पोलीस नशेत आहेत.

उत्तम बांधकामाच्या दर्जासाठी महारेरा आग्रही

■ प्रतिनिधी, मुंबई

खासगी गृहप्रकल्पातील इमारतींचा बांधकाम दर्जा राखला जावा, बांधकाम दर्जा सुधारावा यासाठी आता महारेरा आग्रही आहे. त्यामुळेच आता दर्जात्मक बांधकामासाठी आणि बांधकामातील त्रुटी दूर करण्यासाठी महारेराने स्थावर संपदा क्षेत्रातील गुणवत्ता आश्वासन अहवालाचा आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या आराखड्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत सूचना देण्याचे आवाहन महारेराने विकासकांच्या संघटनांना केले आहे.

बांधकाम व्यवसायात पारदर्शकता यावी आणि ग्राहकांची विकासकांकडून होणारी फसवणूक रोखण्यासाठी रेरा कायदा आणण्यात आला आहे. महारेराच्या माध्यमातून महाराष्ट्रात रेरा कायद्याची अंमलबजावणी केली जात आहे. तर ग्राहक हित लक्षात घेऊन महारेराकडून विविध प्रकारे प्रयत्न केले जात आहेत.

याचाच भाग म्हणून आता महारेराने बांधकाम दर्जाकडेही आता लक्ष वेधले आहे. खासगी विकासकांचे बांधकाम चांगल्या दर्जाचे असल्याचे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात बांधकामाच्या दर्जाबाबत मोठ्या संख्येने तक्रारी असतात. अनेकदा ग्राहकांची फसवणूक होताना दिसते.

त्यामुळे आता खासगी गृहप्रकल्पात बांधकाम दर्जा राखला जावा आणि ग्राहकांचे समाधान व्हावे यासाठी आता महारेरा आग्रही असणार आहे. यासाठी स्थावर संपदा क्षेत्रातील गुणवत्ता आश्वासन अहवालाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. हा आराखडा या आराखड्याअंतर्गत बांधकामांबाबत प्रमाणित कार्यपद्धती, मानके ठरविणे अशी कामे केली जाणार आहेत. तर मुळातच बांधकामाबाबत तक्रारी उद्भवू नये यासाठी आधीच बांधकाम पाळतीवर काय करता येईल? कशी काळजी घेता येईल? त्यासाठी सुनिश्चित कार्यपद्धती कशी ठरवायची? त्यात कुठल्या बाबींचा समावेश असावा? त्यासाठीचे मापदंडही कसे ठरवायचे? यावदलच्या सूचना विकासकांकडून मागविण्यात आल्या आहेत.

LKP FINANCE LIMITED
CIN: L65990MH1984PLC032831
Regd.Office: 203, Embassy Centre, Nariman Point, Mumbai-400 021.
Tel: 91-22-40024785 / 86 Fax: 91-22-22874787

NOTICE

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on **Wednesday, October 25, 2023**, to *inter-alia*, consider and approve Un-Audited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Second Quarter ended September 30, 2023.

This notice can be accessed on the Company's website www.lkpfinance.com and can also be accessed on the stock exchange's website at www.bseindia.com.

For LKP Finance Limited
Sd/-
Girish Kumar Innani
General Manager (Legal) & Company Secretary

Place : Mumbai
Date : October 13, 2023

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,
जि. ठाणे महाराष्ट्र, जुना एस.टी. स्टॅण्ड, कापाळी, भिवंडी -४२१ ३०२, जि. ठाणे.

बांधकाम विभाग

शुद्धीपत्रक ई निविदा सन - २०२३-२४

खालील काम करण्यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. खालील नमुद निविदा प्रसिद्ध झाल्या असून, निविदेकरिता खालील प्रमाणे सूचना वाचण्यात याव्यात.

अ. क्र	कामाचे स्वरुप	ई-निविदा सूचना क्र.	अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक
१	भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालयाच्या मंडाई कमानदार येथील चौक/ कार्नर येथे लगाना रगडा आर.सी.सी. फ्रन्टिंग (मुलभूत मांगणीप्रमाणे विकास योजनेअंतर्गत)	६९	४,९९,९८,४५३/-	दिनांक :-०३/१०/२०२३ दिनांक :-१७/१०/२०२३
२	भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालयाच्या चौपाळा येथील चौपाळा मध्यानभूमी येथे सरळ पिल रोपणे (मुलभूत मांगणीप्रमाणे विकास योजनेअंतर्गत)	९७	२,९९,१६,६९४/-	दिनांक :-२२/०९/२०२३ दिनांक :-१०/१०/२०२३
३	ठेकेदारांचा वर्ग -२ व वर्ग - ३ अस्तीत्व ही अट वगळण्यात येत आहे.			

सदर ई-निविदेकरीत उपरोक्त कालावधी व सूचना वाचण्यात यावी. निविदेबाबतची माहिती mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा दि. १७/१०/२०२३ रोजी दु.३.०० वाजे पर्यंत स्वीकारण्यात येतील.

सही/-
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका